महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर**

ता –वाळवा, जि –सांगली

**“वार्षिक क्रीडा स्पर्धा अहवाल २०२३-२०२४”**

---

दि. ७,८ व ९ जानेवारी २०२४ रोजी आपल्या कॉलेजमध्ये शौक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कबड्डी (मुले,मुली), व्हॉलीबॉल(मुले), बॅडमिंटन (मुले,मुली) व बुद्धिबळ (मुले,मुली) या एकूण चार क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा यात घेण्यात आल्या. कॉलेज मध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा चालू झाल्याचे हे दुसरे वर्ष, स्पर्धा घेण्याचा “उद्देश एकच होता विद्यार्थी, विद्यार्थिनीचा खेळातील सहभाग वाढविणे होय.”सदर स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद पाहता हा उद्देश काही अर्थी तरी सफल झाला असे म्हणता येईल.

स्पर्धेचे उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांचे हस्ते झाले, या प्रसंगी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे, जुनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील,आय. क्यु. एस. सी.समन्वयक डॉ.प्रमोद गंगणमाले, सिनियर कार्यध्यक्ष डॉ. बळीराम सावंत, जुनियर कार्यध्यक्ष्य प्रा.पी.एच.पाटील, जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. के. आर. ठाकरे हे उपस्थित होते. डॉ. संदीप पाटील यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले. डॉ. अमितराज माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.त्यांनी आपल्या प्रास्ताविकात एकूणया स्पर्धे विषयी माहिती दिली या स्पर्धेत मुलांच्या कबड्डीमध्ये एकूण १४ संघांनी तर मुलींच्यात एकूण ४ संघांनी सहभाग घेतला. मुलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग घेतला. तर मुले आणि मुली यांनी बुद्दीबळ मध्ये एकूण ३५ खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, बेडमिंटन स्पर्धेत एकूण ४५ विद्यार्थांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे उद्धाटक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी मनोगतात खेळामुळे होणारे फायदे व मिळणाऱ्या संधी याविषयी सांगितले. त्याचबरोबर आपल्या कॉलेजला खेळाची चांगली परंपरा आहे त्या अनुषंगाने विविध शालेय व विद्यापीठ स्पर्धेत आपण सहभागी होऊन प्राविण्य मिळवावे व कॉलेजचे नाव उंचवावे असे सांगितले. या उद्धाटन प्रसंगी आयपील धर्तीवर सर्व सांघिक संघाच्या कर्णधाराना आपल्या संघाची व आपली ओळख सर्वांना करून देण्यासाठी बोलावले गेले. उपस्थित सर्व मान्यवरांनी ही सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे उद्धाटन प्राचार्य विरुद्ध उपप्राचार्य असा बुद्धिबळाचा सामना घेऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार

प्रा. के. आर. ठाकरे यांनी मानले या प्रसंगी प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२३-२४**

**-:खेळाडू व संघ संख्या:-**

| **अ. क्र** | **खेळ** | **खेळाडूंची संख्या** |
|---|---|---|
| १ | कबड्डी (मुले) | १२ संघ =१२७ |
| २ | कबड्डी (मुली ) | ०५ संघ =५० |
| ३ | व्हॉलीबॉल (मुले ) | १० संघ =११० |
| ४ | बेडमिंटन (मुले) | २४ |
| ५ | बेडमिंटन ( मुली) | १६ |
| ६ | बुद्धिबळ(मुले व मुली) | २० |
| **एकूण सहभागी विद्यार्थी =** | | **३४७** |

# वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२३-२४

## क्षणचित्रे











GPS Map Camera
Sangli, Maharashtra, India
2662+XFP, Maharashtra 415403, India
Lat 17.012304°
Long 74.201492°
05/04/23 11:43 AM GMT +05:30




GPS Map Camera
Sangli, Maharashtra, India
2662+XFP, Maharashtra 415403, India
Lat 17.012304°
Long 74.201492°
05/04/23 11:43 AM GMT +05:30
Google

